दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com
● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.१० जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २२४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये
● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 10 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 224 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### केज तालुक्यातील प्राथमिक शाळेतील प्रकार

# सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीची शिक्षकानेच काढली छेड!

## याच नराधमाने मागील वर्षी सुद्धा केली होती अशीच आगळीक

### गटशिक्षणाधिकारी बेडसकर यांची शाळेला भेट

केज (गौतम बचुटे):केज तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील एका नराधम शिक्षकाने चक्क सहावीच्या वर्गात शिकत असलेल्या अल्पवयीन मुलीची छेड काढून शिक्षण क्षेत्राला आणि शिक्षकी पेशाला काळिमा फासण्याचा निंदनीय प्रकार केला आहे. हा खळबळजनक प्रकार बीड जिल्ह्यात उघड झाल्यामुळे नागरिकांत तीव्र संतापाची लाट निर्माण झालेली आहे. दि.३ जुलै २०२५ रोजी गुरुवारी दुपारी २:०० वा. च्या दरम्यान शाळेच्या मध्यंतर वेळी कॅरम खेळत असलेल्या सहावीच्या मुलींच्या अंगाला वाईट हेतूने स्पर्श केला आणि त्यांच्याशी तुमचे नवरे निवडा अशा प्रकारे बोलून त्यांना लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. त्या नंतर एका मुलीनी हा प्रकार घरी तिच्या पालकांना सांगितल्या नंतर दि. ८ जुलै रोजी एका पालकाने गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या बाबतची लेखी तक्रार त्यांना सादर केली. घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ स्वत: गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर, केंद्र प्रमुख अर्जुन बोराडे व केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत काळे यांनी शाळेला भेट देऊन चौकशी केली.



#### शिक्षणविभागाने सुद्धा पोलिसांत तक्रार द्यायला हवी

या प्रकरणी पालकांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिलेली नाही परंतु त्यांनी गटक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार दिली असल्याने त्या संदर्भात त्यांनी पोलिसांना माहिती द्यायला हवी. कारण सदर शिक्षक हा सावकारी आणि प्लॉटिंगच्या व्यवसायात असल्याने तो पालकावर दडपण आणण्याची शक्यता आहे.

#### त्या शिक्षकाचा फोन बंद

या बाबत शिक्षकाशी फोनवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्याचा फोन बंद आहे.

#### मागील वर्षी देखील याच नराधम शिक्षकाने केली होती आगळीक !

मागील वर्षी देखील या शिक्षकाने एका शालेय विद्यार्थिनीचा विनयभंग केला होता परंतु त्याची गावात वाच्यता झाल्यानंतर सदर प्रकरण हे गावातच तडजोड करून मिटविण्यात आले असल्याची माहिती समजते आहे.

#### पालक आणि विद्यार्थ्यात भीतीचे वातावरण

या भयानक प्रकारामुळे शाळेत शिकणारे विद्यार्थी आणि पालक यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

#### निलंबनाची कारवाई करण्यात येणार

सदर प्रकारा विषयी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी (प्रा.) फुलारी यांच्याशी दूरध्वनी वरून संपर्क साधला असता त्यांनी या दोषी शिक्षकावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

या प्रकरणी पालकांचा तक्रार अर्ज प्राप्त होताच आम्ही शाळेला भेट देऊन चौकशी केली असून त्याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयात सादर केला आहे.
– लक्ष्मण बेडसकर, गटशिक्षणाधिकारी, केज

#### अद्याप पोलिसात गुन्हा दाखल नाही

पीडित मुलीच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार केलेली असून त्यांनी युसुफवडगाव पोलीस ठाण्याची संपर्क साधलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्या नराधम शिक्षकावर गुन्हा दाखल झालेला नाही.

#### गटशिक्षाधिकाऱ्याकडे दिली शिक्षकाने त्याच्या गैरकृत्याची कबुली

गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेला भेट देऊन माहिती घेतली असता त्या नराधमाने त्याने केलेल्या गैरकृत्याची कबुली दिली असल्याची माहिती मिळत असून चौकशी अहवालात गट शिक्षणाधिकारी यांनी त्याचा उल्लेख केला असल्याची माहिती मिळते आहे.

---

# भदंत डॉ.उपगुप्त महाथेरो व प्रा.रोडे यांचा कंबोडिया दौरा यशस्वी

### बौद्ध स्थळांच्या संवर्धनासाठी कंबोडियन मंत्र्यांशी महत्त्वपूर्ण चर्चा

बीड । प्रतिनिधा

बुद्धविहार समितीचे अध्यक्ष व अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, भंते शिलरत्न आणि २६ उपासकांच्या प्रतिनिधीमंडळाने बुधवार, दि. २ जुलै रोजी कंबोडियाची राजधानी फेनॉम पेन्ह येथे कंबोडियाचे पर्यटन मंत्री मा. हॉट हक आणि धर्म व संस्कृती मंत्री मा. चाय बोरिन यांची औपचारिक भेट घेण्याचा सन्मान प्राप्त केला.



या भेटीद्वारे भारत आणि कंबोडिया यांच्यातील सांस्कृतिक व आध्यात्मिक संबंध अधिक दृढ करण्यास हातभार लागला. चर्चेदरम्यान बौद्ध वारसा, धर्म-संस्कृती आणि दोन्ही देशांतील बौद्ध सहकार्याच्या संधींवर सखोल विचारमंथन झाले. विशेषतः महाराष्ट्रातील अजिंठा लेण्यांजवळ प्रस्तावित पाली विद्यापीठ स्थापनेच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमावर केंद्रित चर्चा झाली.

याच बैठकीत भारतातील बौद्ध स्थळांची दुरवस्था, पुरातत्व खात्याची उदासीनता, भिक्खू व बौद्ध अनुयायांना मिळणाऱ्या सरकारी सुविधांचा अभाव यावरही चिंता व्यक्त करण्यात आली. कंबोडियाच्या मंत्र्यांनी या उपक्रमाला मनःपूर्वक पाठिंबा दर्शवून, भारत ही बौद्ध धम्माची जन्मभूमी असल्याने आम्ही या प्रयत्नांमध्ये सहकार्य करू, असे आश्वासन दिले.भदंत डॉ. उपगुप्त यांनी या सकारात्मक प्रतिसादाबद्दल कंबोडिया सरकारचे आभार मानले व शांती, करुणा आणि प्रज्ञेच्या आधारे दोन्ही देशांनी बौद्ध सहकार्य पुढे नेत राहावे, असा निर्धार व्यक्त केला. या ऐतिहासिक संवादाच्या शेवटी डॉ. उपगुप्त यांचा शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी प्रा.प्रदीप रोडे, भंते शिलरत्न, इंजि. रवींद्र कोलप, प्राचार्य डॉ. केशवराव जोंधळे, आयु. पंडित प्रधान (संस्थाचालक), आयु.सरोजा बनसोडे (आयकर अधिकारी), कैलास शिंदे (उद्योजक),आयु. दशरथ तूपसमंदर, आयु. तुकाराम मगर आदी उपासक उपस्थित होते.

---


# गुरूभक्तीचा उत्सव! श्री बजरंग बली वेताळ मंदिरात गुरूपौर्णिमा सोहळा उत्साहात साजरा होणार

परळी । प्रतिनिधी

श्री बजरंगबली वेताळ मंदिरात गुरूवार, दि. १० जुलै रोजी पारंपरिक भक्तिभावाने गुरूपौर्णिमा उत्सव साजरा होणार आहे. प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही भाविक भक्तांसाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, संयोजक प.पू. विलासानंद महाराज यांनी या पवित्र उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन सर्व भाविकांना केले आहे.

उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे गुरूपूजनाचा विशेष सोहळा असून, त्यानंतर दुपारी १२ वाजता महाआरती आणि १ वाजता सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भक्ती, श्रद्धा आणि सेवा यांचे प्रतीक असलेल्या या दिवशी गुरूंच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मोठ्या संख्येने भक्तगण एकत्र जमणार आहेत.

या शुभ दिवशी गुरूंच्या मार्गदर्शनाची प्रेरणा घेऊन, अध्यात्मिक उन्नतीचा मार्ग आत्मसात करण्याचा संदेश यानिमित्ताने दिला जाणार आहे. सर्व भक्तांनी



आपल्या कुटुंबासह या दिव्य कार्यक्रमास उपस्थित राहून पुण्यसंचय करावा, असे आवाहन संयोजक प.पू. विलासानंद महाराज यांनी केले आहे.

---

# कामगार अघाडी महा.प्रदेश उपाध्यक्षपदी अमर शेख यांची निवड

नेकनूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना संस्थापक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख यांचे सामाजिक व राजकीय काम पाहून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या आदेशाने प्रदेश कार्यालय महाराष्ट्र कामगार आघाडी उपध्यक्ष पदी शेख अमर यांची नियुक्ती उपमुख्यमंत्री अजित दादा यांच्या हस्ते करण्यात आली महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नगर सेवक अमर शेख यांनी काही दिवसा पूर्वीच मा आ अमरसिंहजी पंडित यांच्या नेतृत्वाखाली पक्ष प्रवेश केलेला असून शेख अमर यांचे



सामाजिक व राजकीय कामे पाहून पक्षाचे सरचिटणीस मा आ अमरसिंहजी पंडित, गेवराई विधानसभेचे आमदार विजयसिंहजी पंडित यांच्या शिफारशी नुसार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या आदेशाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कामगार आघाडी प्रदेश उपाध्यक्ष अमर शेख यांची मुंबई येथे करण्यात आली या निवडी वेळी गेवराईचे आमदार विजयसिंहजी पंडित. शेख निजाम, बळवंत चव्हाण, प्रक्षित पाटील, रईस चाऊस, नबील जमा. यांची उपस्थिती होती. या निवडीमुळे नेकनूर सरपंच उप सचिन शिंदे. माजी सरपंच. राजा भैय्या. चंदू काकाजी. नेकनूरचे कामगार संघटना शहराध्यक्ष. शेख शाकेर आदिनी त्यांचे अभिनंद केले आहे .

---

# बाल कीर्तनकार ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे यांच्या कीर्तनाने

### आज न्यू हायस्कूल शाळेत गुरुपौर्णिमा साजरी होणार

परळी । प्रतिनिधी

गुरुपौर्णिमेनिमित्त न्यू हायस्कूल शाळेत प्रथमच कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या सोहळ्यात शाळेचीच विद्यार्थीनी व बाल कीर्तनकार ह.भ.प. जनाई महाराज कोकाटे यांचे कीर्तन होणार आहे. गुरुवार, दि. १० जुलै रोजी सकाळी ७.३० वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.'गुरु-शिष्य परंपरा व गुरूंचे महत्व' या विषयावर जनाई महाराज कोकाटे विद्यार्थ्यांसमोर प्रभावी कीर्तन सादर करणार आहेत. त्यांच्या कीर्तनातून विद्यार्थ्यांमध्ये गुरूविषयी आदर, भक्ती व संस्कार रुजवण्याचा प्रयत्न होणार आहे. या आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांच्या वतीने करण्यात आले आहे. शाळेच्या आवारात भक्तीमय वातावरण निर्माण होणार असून, विद्यार्थ्यांसाठी हा एक प्रेरणादायी व संस्मरणीय अनुभव ठरणार आहे.



संपादकीय

## हवामान बदल: प्राण्यांसाठी संकट

'ओएसयू कॉलेज ऑफ फॉरेस्ट्री' आणि मेक्सिकोच्या संशोधकांनी सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेल्या जैवविविधता डेटासेटचा वापर करून ३५ विद्यमान वर्गांमधील ७० हजार ८१४ प्रजातींच्या प्राण्यांच्या डेटाचे परीक्षण केले. 'इंटरनॅशनल युनियन फॉर कन्झर्वेशन ऑफ नेचर'(आययूसीएन)ने केलेल्या मूल्यांकनानुसार, संशोधकांनी वर्ग आणि हवामानबदलाच्या धोक्यांच्या आधारावर प्रजातींचे विभाजन केले. या वर्गांमध्ये अर्कनिड्स आणि चिलोपोडन्स (सेंटीपीड्स) तसेच अँथोझोअन्स आणि हायड्रोझोअन्स (जेलीफिश आणि कोरलशी संबंधित सागरी अपृष्ठवंशी प्राणी) यांचा समावेश आहे. इतर वर्गांमधील प्रजातींचे प्रमाण खूपच कमी आहे, जे तापमान वाढीच्या हवामानामुळे थेट धोक्यात आहे.संशोधकांना समुद्रातील अपृष्ठवंशी प्राण्यांबद्दल विशेष काळजी आहे, जे हवामान बदलामुळे होणारी बहुतेक उष्णता शोषून घेतात. हे प्राणी अधिकाधिक असुरक्षित होत आहेत कारण त्यांची हालचाल करण्याची आणि प्रतिकूल परिस्थितीतून लवकर बाहेर पडण्याची क्षमता मर्यादित आहे. हवामान बदलामुळे मानव आणि वन्य प्राण्यांमधील संघर्ष वाढत आहे. उष्णतेच्या लाटा, वणवे, दुष्काळ आणि पूर यांसारख्या घटनांमुळे मोठ्या प्रमाणात मृत्यू होऊ शकतात. परागण आणि परजीवीवाद यांसारख्या प्रजातींच्या अंतर्गत परस्पर संवादावरदेखील परिणाम होण्याची शक्यता आहे, जे परिसंस्थेच्या कार्यासाठी आवश्यक आहेत. मानवनिर्मित सीमा आणि हवामानबदल वन्यजीव धोक्यात वाढ करतात.संशोधकांनी म्हटले आहे की, पाण्याच्या वाढत्या तापमानामुळे इस्रायलच्या किनाऱ्यावरील मोलस्क प्राण्यांच्या संख्येत नव्वद टक्के घट होणे अपृष्ठवंशी प्राणी किती असुरक्षित आहेत, हे दर्शवते. इतर उदाहरणांमध्ये २०२१च्या पॅसिफिक नॉर्थवेस्ट हीट डोम दरम्यान अब्जावधी इंटरटाइडल इनव्हर्टेब्रेट्सचा मृत्यू आणि २०१६ मध्ये आलेल्या तीव्र सागरी उष्णतेच्या लाटेनंतर ग्रेट बॅरियर रीफच्या २९ टक्के भागात कोरलचा विनाशकारी मृत्यू यांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणात मृत्यूदर हा फक्त अपृष्ठवंशी प्राण्यांपुरता मर्यादित नाही. २०१५ आणि २०१६ मध्ये उत्तर अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील सुमारे ४० लाख कॉमन मुरे हे तीव्र सागरी उष्णतेच्या लाटेमुळे, बदलत्या अन्नजाळ्यामुळे आणि उपासमारीने मृत्युमुखी पडले. त्याच उष्णतेच्या लाटेमुळे पॅसिफिक कॉडमध्ये ७१ टक्के घट झाली, कारण चयापचय मागणी वाढली आणि शिकार बेस कमी झाला. उत्तर पॅसिफिकमध्ये सुमारे ७,००० हंपबॅक व्हेलच्या मृत्यूमागे सागरी उष्णतेच्या लाटांची भूमिका असू शकते.वन्यजीवांना असलेल्या हवामान बदलाच्या धोक्यांबद्दल गोळा केलेली माहिती तुलनेने कमी आहे. बहुतेक वन्य जीव वर्गांचे (१०१ पैकी ६६) अद्याप 'आययूसीएन'ने कोणत्याही प्रजातीचे मूल्यांकन केलेले नाही. आज जिवंत वन्य जीव प्रजातींपैकी मूल्यांकन केलेल्या ७० हजार ८१४ प्रजाती सुमारे ५.५ टक्के आहेत. हवामान बदलामुळे बंगालच्या उपसागरात ऑक्सिजनची कमतरता वाढत आहे, मृत क्षेत्रे तयार होत आहेत.अभ्यास संशोधनात केलेले विश्लेषण हे वन्य जीव प्रजातींना असलेल्या हवामानाच्या धोक्यांचे मूल्यांकन करण्याचा एक प्रारंभिक प्रयत्न आहे. माहितीपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी धोके समजून घेणे महत्त्वाचे आहे. सर्व परिसंस्थांमध्ये प्राण्यांच्या प्रजातींसाठी हवामान बदलामुळे होणाऱ्या मोठ्या प्रमाणात मृत्यूदराच्या घटनांवर जागतिक डेटाबेस आवश्यक असून सध्या दुर्लक्षित प्रजातींचे मूल्यांकन जलद करणे आवश्यक आहे. सर्व प्रजातींना हवामानामुळे होणाऱ्या धोक्यांचे मूल्यांकन करण्याची आणि अनुकूलन क्षमतेचा चांगल्या प्रकारे विचार करण्याची आवश्यकता आहे, असे संशोधकांनी पेपरमध्ये म्हटले आहे. जैवविविधता आणि हवामान बदल धोरण नियोजन जगभरात एकत्र आणण्याची आवश्यकता आहे.एक चतुर्थांश प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे. गोड्या पाण्यातील ६४ परिसंस्था पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या एक टक्क्यापेक्षा कमी भाग व्यापतात; परंतु त्या ग्रहावरील जीवनासाठी महत्त्वाच्या आहेत. नवीन संशोधनातून दिसून आले आहे की, वातावरणाचे नुकसान गोड्या पाण्यातील जीवसृष्टीला नष्ट होण्याच्या जवळ पोहोचवत आहे. २४ टक्के प्रजाती नामशेष होण्याचा धोका आहे. मासे, खेकडे आणि ड्रॅगन फ्लायच्या हजारो प्रजाती येत्या काही दशकांमध्ये नामशेष होऊ शकतात. गोड्या पाण्यातील सुमारे २४ हजार प्रजातींच्या आरोग्याच्या एका महत्त्वाच्या मूल्यांकनात आढळून आले आहे की, सुमारे एक चतुर्थांश प्रजाती नामशेष होण्याच्या स्थितीत आहेत. यापैकी सुमारे एक हजार प्रजाती अत्यंत धोक्यात असल्याचे मानले जाते, तर २०० आधीच नामशेष होण्याची शक्यता आहे.हे आकडे हिमनगाचे फक्त टोक आहे. गोड्या पाण्यातील जैवविविधता जपणे हे जागतिक आव्हान आहे. कारण हजारो प्रजातींच्या नामशेष होण्याचा धोका योग्यरीत्या समजून घेण्यासाठी शास्त्रज्ञांकडे आवश्यक ती माहिती नाही. या प्राण्यांना समजून घेण्यासाठी आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने कृती करण्याची आवश्यकता आहे, असे अभ्यासाच्या प्रमुख लेखक कॅथरीन सेयर म्हणतात. गोड्या पाण्यातील भूदृश्ये पृथ्वीवरील सर्व ज्ञात प्रजातींपैकी दहा टक्के प्रजातींची घरे असून अब्जावधी लोकांसाठी सुरक्षित पिण्याचे पाणी, उपजीविका, पूर नियंत्रण आणि हवामानबदल कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष 'नेचर जर्नल'मध्ये प्रकाशित झाले.

# विमान दुर्घटना भयावह; कशामुळे नि कोणामुळे?



१२ जून २०२५ ही तारीख, सर्व देशवासीयांसाठी एक भयावह मृत्यूचा थरार ऐकविणारी ठरली. कोणाच्या मनीध्यानी नसताना गुरुवारी दुपारी गुजरातमध्ये झालेल्या विमान अपघातानंतर देशाचे वातावरण हादरून गेले. परदेशी प्रवाशांना घेऊन लंडनसाठी रवाना झालेले एअर इंडियाचे विमान अहमदाबादमधील मेघानी नगर परिसरात काही मिनिटांत कोसळल्याची दुर्घटना घडते. या अपघाताची माहिती ज्यांच्या ज्यांच्या कानावर पडते त्यांची एक सार्वत्रिक प्रतिक्रिया असते, बापरे. बातमी वाऱ्यासारखी देशभर पसरते अन् सारा देश सुन्न झाल्याचे चित्र पाहायला मिळते. या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह एकूण २४२ प्रवासी होते.

ज्या डॉक्टरांच्या हॉस्टेलच्या इमारतीवर विमान आदळले, तिथे किती नुकसान झाले. डॉक्टरांसह किती जणांचे बळी गेले हा आकडा कानावर येण्याअगोदर विमानातील २०० हून अधिक मृत्युमुखी पडल्याची बातमी हृदय हेलावणारी होती. सुदैवाने दोन प्रवासी नशीब बलवत्तर म्हणून वाचला. आता विमान जळून खाक झालं. त्यामुळे प्रवाशांची ओळख पटणे हे जिकिरीचे काम असल्याने, जे प्रवासी मृत्युमुखी पडले त्यांचे अंत्यसंस्कार कसे होणार हा नातेवाइकांच्या दृष्टीने भावनिक मुद्दा आहे. विमान प्रवाशांबरोबर काळाने डॉक्टरांच्या समूहावरही घाला घातला. दुपारचे जेवण करताना तोंडात घास पडण्याऐवजी २० हून अधिक डॉक्टरांना मृत्यूने कवटाळल्याचा प्रकार हा स्थानिक गुजरातच्या जनतेवर दु:खाचा डोंगर कोसळल्यासारखाच होता.


हा अपघात कसा झाला हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, एअर इंडियाचे विमान टेकऑफनंतर काही मिनिटांत दुर्घटना घडली. लगेच ६२५ फुटांवरील विमान अहमदाबाद हॉर्स कॅम्पजवळ कोसळले. बोईंग विमानाने आधी पेट घेतला आणि नंतर ते कोसळले. विमानाचा मागचा भाग झाडाला धडकल्याने अपघात झाला की, विमानाच्या इंजिनात बिघाड झाल्याने हा अपघात झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारतात आतापर्यंत झालेल्या विमान अपघाताच्या दुर्घटनांमध्ये अहमदाबादचा अपघात ही अलीकडची मोठी दुर्घटना मानली जात आहे. मात्र या विमान अपघाताच्या बातमीनंतर मुंबईकरांना घाटकोपरसारख्या गजबजलेल्या परिसरामध्ये २०१८ साली कोसळलेल्या विमान अपघाताची आठवण झाली.

घाटकोपरमध्ये कोसळलेले विमान हे लहान आकाराचे म्हणजेच चार्टर विमान होते. चाचणी उड्डाणादरम्यान म्हणजेच टेस्ट फ्लाईटदरम्यान किंग एअरचे चार्टर विमान अपघातग्रस्त होऊन वस्तीत शिरले होते. तसे पाहिले तर भारतात पहिला विमान अपघात १९३८ मध्ये झाला होता. एअर फ्रान्सचे पोटेझ विमान मध्य प्रदेशातील दातियाजवळ कोसळले. त्यात सात जणांचा मृत्यू झाला होता. गेल्या पंधरा वर्षांतील भारतातील दुसरा मोठा अपघात कर्नाटकातील मंगळूरु येथे मे २०१० मध्ये घडला, या अपघातात १५८ जण मृत्युमुखी पडले होते. फेब्रुवारी १९९० मध्ये बंगळूरमध्ये एअरबस ए ३२० विमान लँडिंग करताना धावपट्टीवरून घसरले आणि शेतात पडले, त्यात ९२ जणांचा मृत्यू झाला होता. पायलटच्या चुकीमुळे आतापर्यंत अनेक दुर्घटना घडल्या आहेत. मात्र, याआधी विमानावर दहशतवादी हल्लाही झाला होता. तो जून १९८५ साली खलिस्तान समर्थकांनी विमानावर दहशतवादी हल्ला केला होता.

एअर इंडिया फ्लाइट १८२ त्यावेळी आयर्लंडच्या किनाऱ्याजवळ अटलांटिक महासागरात बॉम्बस्फोटात उडवून देण्यात आले होते. त्यात ३२९ लोकांचा मृत्यू झाला होता. आतापर्यंत झालेल्या विमान अपघाताची कारणे पाहिली तर वैमानिकाची चूक हे विमान अपघातांचे एक प्रमुख मानले जाते. वैमानिकांकडून जेव्हा टेकऑफ दरम्यान वेग, धावपट्टीच्या लिफ्ट ऑफ पॉइंट किंवा पिच अँगलचा चुकीचा अंदाज घेतला जातो, तेव्हा अपघात होतात. आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक अहवालांनुसार, टेकऑफ आणि लँडिंग दरम्यान होणाऱ्या बहुतेक अपघातांमध्ये मानवी चूकही कारणभूत ठरली आहे. त्याचे कारण, टेकऑफ अपघातांपैकी ६५% मानवी चुकांमुळे होतात आणि २०% तांत्रिक बिघाडामुळे तर, १०% हवामानामुळे होतात, ५% इतर कारणांमुळे होतात, अशी जगभरातील आकडेवारी सांगते.

संपूर्ण टेकऑफ प्रक्रिया पायलटच्या नियंत्रणाखाली असते. प्रत्येक निर्णय काही सेकंदांत घ्यावा लागतो. टेकऑफ दरम्यान ऑटो-पायलट नसतो, सर्व नियंत्रण मॅन्युअल असते. टेकऑफचे नियोजन आणि आपत्कालीन स्क्रिप्ट देखील पायलटच्या योजनेवर अवलंबून असते. म्हणूनच टेकऑफ दरम्यान अपघात झाल्यास, विमान वाहतूक तज्ज्ञ प्रथम पायलटच्या निर्णयाची आणि प्रतिक्रियेची तपासणी करत असतात. तसेच खराब हवामानामुळे टेकऑफ दरम्यान विमान अपघात होण्याची कारणे पुढे आलेली आहेत. टेकऑफ दरम्यान जोरदार वारे, गडगडाट, कमी दृश्यमानता किंवा मायक्रोबर्स्ट ही अपघातांची प्रमुख कारणे असतात. इंजिनमध्ये समस्या असल्यास, पक्षी आदळल्यास किंवा सिस्टममध्ये बिघाड झाल्यास, पायलटला काही सेकंदांत निर्णय घ्यावा लागतो की टेकऑफ सुरू ठेवायचे की धावपट्टीवर विमानाला काही प्रकारे थांबवण्याचा प्रयत्न करायचा.अहमदाबाद विमान दुर्घटनेतील पायलट सुमित सबरवाल हा सुद्धा आज जगात नाही. नक्की काय घडले हे आता सांगता येणार नसले तरी, ज्या पद्धतीने गेल्या काही वर्षांत विमान प्रवाशांची संख्या वाढलेली आहे. ते पाहता, भविष्यात अपघात होऊ नये यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर व्हायला हवा. जीवाची किंमत मोठी आहे. एका क्षणार्धात होत्याचे नव्हते... असे एका विमान अपघातातून घडू शकते. अपघात टाळण्यासाठी विमान कंपन्यांबरोबर केंद्र सरकारनेही अधिक लक्ष घालायला हवे.

# कोकणातील विजेचा लपंडाव थांबणार कधी?



आपल्या देशातील विकसनशील राज्यांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र राज्य. त्याच राज्यातील कोकण विभागाचा विचार करता कोकण विभागात आजही विजेचा लपंडाव होत आहे. कोकण विभागात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड म्हणजे महावितरण कंपनी वीज पुरवठा करीत असते. असे असले तरी कोकणातील विजेचा लपंडाव आजही का होतो याची कारणे शोधून त्यावर तातडीने उपाय योजना करणे गरजेचे आहे. कोकण विभागात महावितरण कंपनी वीज पुरवठा करीत असली तरी आजही विजेच्या लपंडावामुळे नागरिकांना बऱ्याचवेळा त्रास सहन करावा लागतो. तसेच वीज ग्राहकांकडून जर बिल उशिरा भरल्यास त्याला दंड आकारला जातो. मात्र दंड भरून सुद्धा विजेचा लपंडाव संपलेला नाही. हे अनेक वर्षे चालत आले आहे. तेव्हा महावितरण कंपनीचे जे अधिकारी आहेत त्यांनी वीज पुरवठ्याची समस्या समजून घेऊन ती तत्काळ सोडविणे आवश्यक आहे. त्यासाठी ज्या समस्या आहेत त्याचा त्या त्या विभागामध्ये सर्व्हे करून ज्या समस्या निर्माण होत आहेत त्यावर उपाय सुचवून ताबडतोब दीर्घकालीन उपाय योजना करायला हव्यात. म्हणजे विजेचा जो लपंडाव आहे तो कमी होऊन नागरिकांना वीज समस्येला तोंड देण्याची वेळ येणार नाही.

याचा चांगला परिणाम महावितरणातील वीजपुरवठा सुरळीत चालण्यास मदत होईल. तेव्हा महावितरण कंपनीने नागरिकांना वीज पुरवठ्याची समस्या सोडवण्यात कोणत्या प्रकारे अपयशी येत आहे त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे, तरच कोकणातील विजेचा लपंडाव थांबण्यास मदत होईल. कोकण विभागातील ग्रामीण भागात आजही अधूनमधून वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे नागरिक त्रस्त असताना दिसून येतात. वीज खंडित झाल्याने आपल्या अंगातील घामाच्या धारा वाहू लागतात. उन्हाळ्याचा विचार करता कडक उन्हामुळे आपल्या अंगाची लाहीलाही झाल्याचे उन्हाळ्यात आपणा सर्वांना अनुभव आला असेल. आता पावसाला सुरू झाला तरी विजेचा लपंडाव थांबलेला नाही. ही कोकणातील सर्वात मोठी समस्या आहे. वीज पुरवठा खंडित झाल्याने अनेक वेळा नागरिकांना नुकसान सहन करावे लागते. अशा वेळी कोकणातील ग्रामीण भागात वारंवार वीज खंडित होत असल्यामुळे विजेचा लपंडाव थांबणार कधी असा प्रश्न नागरिक महावितरण कंपनीला विचारत आहेत. तसेच वीज पुरवठा नियमित होत नसेल, तर त्या विजेचा उपयोग काय? असे असताना सुद्धा नियमित वीज बिले भरावी लागतात. काही वेळा वीज पुरवठा बंद असून सुद्धा विजेच्या बिलात कपात केली जात नाही. काही ठिकाणी मीटर बंद असताना सुद्धा जास्त भाडे आकारले जाते. म्हणजे एकप्रकारे महावितरण कंपनी नागरिकांच्या जीवाचा खेळ खेळत आहे, असेच म्हणावे लागेल.

कोकणामध्ये विजेचा लपंडाव ही आजची समस्या नाही, तर कोकणात वीज पुरवठा सुरू झाल्यापासून कोकणी जनता विजेच्या लपंडावाने त्रासली आहे. अनेक वेळा महावितरण कार्यालयावर मोर्चे काढण्यात आले. अनेक राजकीय नेत्यांनी विजेचा पुरवठा नियमित करण्यात यावा अशा आशयाची पत्रे दिली तरी वीज पुरवठा सुरळीतपणे चालत नाही. फक्त आश्वासने दिली जातात. ही आजची परिस्थिती आहे. असे किती वर्षे चालणार आहे. तेव्हा महावितरणाच्या समस्या जाणून घेऊन त्यावर कायमस्वरूपी उपाय सुचविण्यात आले पाहिजेत. यासाठी वीज पुरवठा खंडित का होतो? काम योग्य प्रकारे झाले आहे का? योग्य पात्रताधारक स्टाफ आहे का? कार्यालये नियमित चालू असतात का? वीज ग्राहकांच्या आलेल्या तक्रारी वेळच्या वेळी सोडवल्या जातात का? कायमस्वरूपी व प्रशिक्षित स्टाफ आहे का? कार्यालयात आवश्यक सुविधा सेवकांना आहे का? विजेला आवश्यक साधनसामग्री उपलब्ध आहे का? स्टाफचे भवितव्य काय? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे महावितरण कंपनीला शोधावी लागतील. मात्र तसे होताना दिसत नाही. जर झाले असते, तर आज विजेचा लपंडाव झाला नसता.

आजच्या धावपळीच्या जीवनात वीज महत्त्वाची झाली आहे. असे असताना सुद्धा आजही ग्रामीण भागात विजेचा लपंडाव दिसून येतो. त्यात रात्रीचे अधिक प्रमाण दिसून येते. तेव्हा वीज पुरवठा करणाऱ्या महावितरण कंपनीने सतर्क राहणे गरजेचे आहे. सध्या वीज नागरिकांची मूलभूत गरज झाली आहे. प्रत्येक गोष्ट विजेवर चालत आहे तेव्हा वीज पुरवठा खंडित झाल्यास जनतेला त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो.

ग्रामीण भागात दर सोमवारी सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळात वीज पुरवठा खंडित केला जातो. मी मे महिन्यामध्ये काही दिवस गावी होतो. सोमवार सोडा संध्याकाळी दहा मिनिटे लाईट चालू, तर वीस मिनिटे लाईट बंद असा उपक्रम रात्री दहापर्यंत चालत असे. त्यानंतर रात्री दोनच्या सुमारास व पहाटेच्या चार साडेचारच्या सुमारास लाईट खंडित होत होती. काही ठिकाणी तीस तास लाईट नाही, २४ तास लाईट गायब, महिनाभर लाईटचा खेळखंडोबा अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मिळाल्या. तेव्हा ग्रामीण असो वा शहरी विभाग विजेचा पुरवठा खंडित होता कामा नये.

वीजेचा पुरवठा खंडित झाल्यास त्याचा परिणाम व्यवसायावर होतो. इतकेच नव्हे, तर आपल्या विभागातील विविध दुकाने, विविध व्यावसायिक, सरकारी कार्यालये, बँका आणि दवाखाने यांना २४ तास लाईटची गरज असते ही महत्त्वाची बाब आहे. त्याप्रमाणे वेळीच बदल करून आपली सेवा सुरळीतपणे महावितरण कंपनीने सुरू ठेवावी. त्यासाठी योग्य ती काळजी कंपनीने घेणे गरजेचे आहे. यात देखभाल महत्त्वाची असते. असे जर झाले, तर कोकणातील विजेचा लपंडाव होणार नाही.

# संतांच्या विचारांना कृतीत उतरवणारा निर्मल दिंडी उपक्रम-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मोहोळ । प्रतिनिधी**

पंढरपूर येथे आषाढी वारीनिमित्त आयोजित निर्मल दिंडी, चरणसेवा आणि आरोग्यवारी या तीन महत्त्वपूर्ण उपक्रमांचा समारोप राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्र्यांनी वारकऱ्यांच्या सेवेमध्ये समाजहित आणि संतविचारांची मोलाची छाप असल्याचे नमूद केले. संतांनी निसर्गप्रेम, स्वच्छता आणि माणुसकीचा जो संदेश दिला, तो आज 'निर्मल दिंडी'च्या माध्यमातून कृतीत उतरवला जात आहे, असे त्यांनी सांगितले.पंढरपूर पंचायत समितीच्या आवारात ग्रामविकास आणि पंचायत राज विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या 'चरणसेवा' उपक्रम आणि राज्य महिला आयोगाच्या आरोग्यवारी उपक्रमांचाही समारोप करण्यात आला. मुख्यमंत्री म्हणाले की, लाखो वारकरी विठुमाऊलीच्या दर्शनासाठी निघतात, अशावेळी त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन २०१८ पासून निर्मलवारी उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यामध्ये पालखी मुक्काम ठिकाणी स्वच्छतागृहांची व्यवस्था, महिलांसाठी आवश्यक सुविधा आणि संपूर्ण वारी मार्गावर स्वच्छता राखण्याचा प्रयत्न केला गेला.

या उपक्रमामुळे महिलांचे वारीतील प्रमाण वाढले असून, संपूर्ण वारी अधिक सुसंघटित आणि स्वच्छ झाली आहे. निर्मल दिंडीच्या माध्यमातून लोककलावंतांनी घराघरात स्वच्छतेचा संदेश पोहोचवला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या 'चरणसेवा' उपक्रमामुळे लाखो वारकऱ्यांना सेवा मिळाली. ही सेवा केवळ वैद्यकीय मदतीपुरती मर्यादित नसून ती विठुरायाच्या चरणांची सेवा आहे, असेही त्यांनी भावनिक शब्दांत सांगितले.'आरोग्यवारी' उपक्रमाअंतर्गत महिलांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन हिरकणी कक्ष, सॅनिटरी नॅपकिनचे वितरण, जळण यंत्र आणि स्तनदा मातांसाठी विशेष सुविधा उभारण्यात आल्या होत्या. यामुळे महिलांना स्वच्छता आणि आरोग्याच्या दृष्टिकोनातून दिलासा मिळाल्याचे मुख्यमंत्री यांनी नमूद केले. त्यांनी पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनाबद्दलही कौतुक केले आणि त्यांचा विशेष सत्कार केला.ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांसाठी जर्मन हँगरमध्ये निवासाची व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, स्वच्छतागृह, स्नानगृह आणि मसाज मशीन



यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. हे नियोजन करताना प्रशासन, सेवाभावी संस्था आणि अनेक स्वयंसेवक अहोरात्र कार्यरत होते.राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आरोग्यवारी उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, महिलांच्या गरजा ओळखून ३७५ ठिकाणी सॅनिटरी नॅपकिनचे वाटप, बर्निंग यंत्र, हिरकणी कक्ष अशा

सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या उपक्रमात महिलांचा भरघोस प्रतिसाद लाभल्याचे त्यांनी नमूद केले.मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी 'चरणसेवा' उपक्रमाची माहिती देताना सांगितले की, जवळपास २ कोटी ७५ हजार वारकऱ्यांना या उपक्रमातून सेवा पुरवण्यात आली. या कार्यात ९ हजारांहून अधिक

वैद्यकीय विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. समाजातून मिळालेल्या योगदानामुळे २ कोटी रुपयांचा निधी गोळा करण्यात आला.जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी 'निर्मल दिंडी' अंतर्गत ११ हजार शौचालये, १५५ हिरकणी कक्ष, लहान बालकांसाठी खेळणी, स्तनदा मातांसाठी सुविधा यांची यशस्वी अंमलबजावणी केल्याची माहिती दिली. स्वच्छतेसाठी १,२३६ कर्मचारी नेमण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण' या उपक्रमाचे बोधचिन्ह अनावरण करण्यात आले आणि निर्मल दिंडी यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल संबंधित जिल्ह्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कलाकारांचा सन्मान करण्यात आला. चरणसेवा व आरोग्यवारी मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांचा देखील मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या समारोप कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, विकास अधिकारी सुशील संसारे आणि विविध मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने निर्मल दिंडी, चरणसेवा आणि आरोग्यवारी याबाबत माहितीपट देखील दाखवण्यात आला.

# लहुजीशक्ती सेनेचे केज येथे महिला अन्याय अत्याचारा विरुद्ध ११ जुलै रोजी रास्ता रोको आंदोलन

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये सध्या गुन्हेगारी थांबायचे नाव घेत नाही.एक झाले की दुसरे प्रकरण तोंड वर करताना दिसून येत आहे.केज तालुक्यातील नाव्होली व लव्हूरी या दोन्ही ठिकाणी मतिमंद मुलींवर अत्याचार झाल्याची घटना घडली.

नाव्होली येथील नानासाहेब चौरे या व्यक्तीवर याअगोदर अट्रॉसिटी व बलात्कारा सारखे गंभीर गुन्हे दाखल असताना त्या व्यक्तीने पुन्हा एकदा मतिमंद मुलींवर अतिप्रसंग केल्यामुळे संपूर्ण तालुक्यातून संताप व्यक्त केला जात आहे.ही घटना ताजी असतानाच केज तालुक्यातील लव्हूरी येथे बाळू जालिंदर कांबळे या नराधमाने गावातीलच एका मतिमंद मुलीवर अत्याचार करून माणुसकीला काळीमा फासणारे घृष्णपद कृत्य केल्यामुळे संताप व्यक्त होतोच आहे,परंतु यामुळे महिला वर्गामध्ये भीतीचे



वातावरण निर्माण झाले आहे.

अशा नराधमाना कडक शासन होण्यासाठी संबंधित प्रकरणे जलद गतीने न्यायालयात चालवावे.त्याचप्रमाणे संबंधित पीडित महिलांचे पुनर्वसन करण्यात यावे.यासह इतर मागण्यांसाठी व संबंधित घटनांचा जाहीर तीव्र निषेध व्यक्त करण्यासाठी दि. ११ जुलै २०२५ रोजी तहसील कार्यालयाच्या समोरील मुख्य रस्त्यावर भव्य रास्ता रोको आंदोलन लहुजी शक्ती सेना महिलाआघाडीच्या वतीने प्रियांकाताई लांडगे यांच्या नेतृत्वा खाली होणार आहे.या संबंधाचे निवेदन तहसील कार्यालय व पोलिस स्टेशनला देण्यात आलेले आहे.


यावेळी दत्ताभाऊ लांडगे,बाबासाहेब जाधव,दिलीप जाधव, नवनाथ जाधव,संपत जाधव,अविनाशजाधव, सचिन गालफाडे,शरद थोरात आझाद क्रांती सेना तालुका प्रमुख, चिंतामण जाधव, आदर्श जाधव,अनिल जाधव इत्यादी उपस्थित होते.

# प्रा.रामदास. झोळ यांचा भाजपमध्ये प्रवेश

## करमाळा तालुक्याच्या राजकारणाला नवी दिशा

**करमाळा । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील खमके समाजसेवक व अभ्यासू नेतृत्व म्हणून परिचित असलेले प्रा. रामदास झोळ हे उद्या (०८ जुलै २०२५) मुंबईतील मंत्रालयात होणाऱ्या विशेष सोहळ्यात भारतीय जनता पक्षात (भाजप) अधिकृतरित्या प्रवेश करणार आहेत. त्यांच्या प्रवेशामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता स्थानिक राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.



स्वतःच्या बळावर त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात निर्माण केलेली ओळख, त्यांची लोकांमध्ये असलेली पकड, तसेच त्यांच्या विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे त्यांना जनतेचा मोठा पाठिंबा मिळतो. भाजपमध्ये प्रवेश केल्याने त्यांच्या कार्याला भक्कम व्यासपीठ मिळेल, अशी अपेक्षा करमाळा वासीयांनी व्यक्त केली आहे.

प्रा. झोळ यांच्यासोबत तालुक्यातील विविध गावांतील सरपंच, सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक नेतेदेखील भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याने पक्षाची संघटनात्मक ताकद वाढण्याची चिन्हे आहेत.स्थानिक निरीक्षकांच्या मते, हा राजकीय प्रवेश म्हणजे केवळ पक्षबदल नसून करमाळा तालुक्याच्या राजकीय भविष्यासाठी निर्णायक क्षण आहे. समाजहितासाठी झोळ यांनी आजवर केलेले कार्य भाजपच्या माध्यमातून अधिक परिणामकारक ठरेल, असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला आहे.

# आषाढी निमित्त सी.डी. देवरे विद्यालयात भक्तिरसात न्हालेला सांस्कृतिक उत्सव

## गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत शिक्षक व माजी विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम

**धुळे। प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील म्हसदी येथील सी.डी. देवरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला भक्तिभाव व सामाजिक जाणिवेने परिपूर्ण असा सांस्कृतिक उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांचे अभंग, संतविचार, गीतांद्वारे वारकरी परंपरेची सुरेख झलक सादर केली. पारंपरिक पोशाख, टाळ, चिपळ्या, लेझीमच्या तालावर दिंडीसदृश पालखी मिरवणूक संपूर्ण गावातून निघाली. गावातील महिलांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीची भक्तीभावाने पूजा केली. संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हालेलं होतं.

या उत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे दत्तक पालक योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व पालकविरहित विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम माजी विद्यार्थी कवी सागर शिंदे व राजधर देसले यांच्या हस्ते पार पडला. सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी झालेल्या



विद्यार्थ्यांना शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजधर देसले यांनी वही बक्षीस म्हणून दिल्या, तर कवी सागर शिंदे यांनी गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश प्रदान केले.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून विद्यालयाचे प्राचार्य एस. ए. देवरे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनायक देवरे, सुभान पिंजारी, दिलीप देवरे, रामराव हयाळीस, ह.भ.प. सतीलाल महाराज, माजी शिक्षक एन. टी. बोरसे, ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांना राजगीराच्या लाडूंचे वाटप करण्यात आले. या प्रेरणादायी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य सतिष देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.शाळेतील सामाजिक बांधिलकी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली सकारात्मक बांधीलकी या कार्यक्रमातून ठळकपणे जाणवली.

# निळवंडे धरणातून विसर्ग सुरू; नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**अकोले । प्रतिनिधी**

अकोले तालुक्याच्या पश्चिम घाटमाथ्यावर असलेल्या भंडारदरा व घाटघर परिसरात मागील काही दिवसांपासून जोरदार पावसाची संततधार सुरू आहे. या पावसामुळे भंडारदरा धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत असून त्यामुळे धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर निळवंडे (उर्ध्व प्रवरा) धरणातून सोमवार, दिनांक ७ जुलै रोजी सकाळी ९ वाजता ६५७० क्युसेस दराने प्रवरा नदी पात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला.

पावसाचे प्रमाण लक्षात घेता पुढील काही तासांत निळवंडे जलाशयातून विसर्ग अधिक प्रमाणात वाढण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. या विसर्गामुळे प्रवरा नदीच्या पाणीपातळीत वाढ होणार असून अकोले, संगमनेर, ओझर बंधाऱ्याखालील गावांसह राहाता, राहुरी, श्रीरामपूर व नेवासा तालुक्यांतील सर्व नदीकाठच्या गावांना व वस्त्यांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. नदीपात्राजवळ जनावरं किंवा इतर साहित्य ठेवलं असल्यास



ते तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत नदीपात्रात उतरणे अथवा उशिरा हालचाल करणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.पावसाच्या स्थितीवर प्रशासनाचे लक्ष असून धरणातील विसर्गात गरजेनुसार बदल केला जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून प्रशासनाशी संपर्कात राहावे, असे आवाहन कार्यकारी अभियंता प्रदीप हापसे (उर्ध्व प्रवरा धरण विभाग, संगमनेर) यांनी केले आहे.दरम्यान, निळवंडे धरणातून विसर्गाचा वेग वाढवून ८५०० क्युसेस इतक्या दराने पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे प्रवरा नदीवरील अगस्ती मंदिराकडे जाणारा छोटा पूल पाण्याखाली गेला असून वाहतुकीसाठी पूर्णतः बंद करण्यात आला आहे. कोणीही सदर पुलावरून प्रवास करू नये, असे स्पष्ट आवाहन अकोले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी केले आहे.नदीकाठच्या नागरिकांनी अधिक काळजी घेऊन सुरक्षितता बाळगावी, प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि धरणाच्या विसर्गासंदर्भातील अधिकृत माहितीकरिता स्थानिक यंत्रणेशी संपर्क ठेवावा, असेही आवाहन यावेळी करण्यात आले.

# नागरिकांच्या हिताचे रक्षण,माझी जबाबदारी आ.सुधीर मुनगंटीवार यांनी दिली ग्वाही

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या नावाखाली बल्लारपूर शहरातील रवींद्रनगर वार्ड, मौलाना आझाद वॉर्ड, पं. दीनदयाल उपाध्याय वॉर्ड आणि डॉ. राजेंद्र प्रसाद वॉर्डांमधील वनजमिनीवरील घरे हटविली जाणार असल्याच्या अफवांनी या वार्डातील नागरिकांमध्ये चिंता आणि भीतीचे वातावरण निर्माण केले. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात विशेष बैठक घेण्यात आली. बैठकीत राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी नागरिकांच्या हिताचे रक्षण ही माझी जबाबदारी असून या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन यावेळी केले.

वनजमिनीवरील निवासी घराचे अतिक्रमण असलेल्या वार्डामध्ये आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी त्यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा, जेष्ठ नेते चंदनसिंह चंदेल, शहराध्यक्ष रणंजय सिंग,बल्लारपूरच्या तहसीलदार रेणुका कोकाटे, नागरिकांची उपस्थिती होती.आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, रवींद्रनगर, मौलाना आझाद वॉर्ड, पं. दीनदयाल उपाध्याय वॉर्ड आणि डॉ. राजेंद्र प्रसाद वॉर्ड या भागांतील नागरिक मागील ३० ते ४० वर्षांपासून वनजमिनीवर वास्तव्यास आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न सुरू असतानाच काहीजणांनी अफवा पसरवून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या पार्श्वभूमीवर आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले.

सदर नागरिक मागील ३० ते ४० वर्षांपासून विना पट्ट्याने या ठिकाणी वास्तव्यास आहेत. या चारही वार्डांतील नागरिकांना कोणीही बेघर करू शकत नाही. त्यामुळे कोणीतरी आम्हाला हटवेल, अशी भीती आणि भाव मनातही आणू नये.या चारही वॉर्डांमध्ये एकूण २८६५ घरे वनजमिनीवर असून, सुमारे १०,१८० नागरिक या ठिकाणी वास्तव्यास आहेत. या सर्व वॉर्डांमध्ये शासनाच्या वतीने रस्ते, नाल्या, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा अशा सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. एकूण २८६५ मालमत्तांपैकी सुमारे २५८५ मालमत्ता वनविभागाच्या जागेवर असून २७८ मालमत्ता नझूलच्या जागेवर स्थित आहेत. त्यापैकी पंडित दीनदयाल वार्डातील १२४ मालमत्ता तसेच रवींद्र



नगर वार्डातील १५४ मालमत्ता नझूलच्या जागेवर आहे. या सर्व मालमत्तांचे एकत्रित क्षेत्रफळ सुमारे ५९ हेक्टर म्हणजेच १५० एकर इतके आहे.नझूलच्या जागेवर पट्टे देणे तुलनेने सोपे असले, तरी वनविभागाच्या जागेवर पट्टे देणे अधिक कठीण आणि गुंतागुंतीचे आहे. तथापि, या जमिनीवर राहणाऱ्या नागरिकांना पट्टे देण्यासाठी प्रयत्न सुरू असून, महसूल जमिनीवर पट्टे वितरणासाठी सर्वेक्षणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासोबतच, स्थानिक पदाधिकाऱ्यांची एक विशेष टीम तयार करून, हा विषय दिल्लीमध्ये मा.प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी व केंद्रीय मंत्री भूपेंद्रजी यादव यांच्यासमोर मांडून विशेष बैठकीचे आयोजन करावे लागेल. तसेच, येथील वास्तव्यास असलेल्या प्रत्येक अतिक्रमणधारक कुटुंबाचा सविस्तर फॉर्म भरून घेण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाने पार पाडावी. नागरिकांच्या हिताचे रक्षण ही माझी जबाबदारी असून मी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. त्यामुळे येथील नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन आ. मुनगंटीवार यांनी यावेळी केले.

दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक


## पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

# महामानव अभिवादन ग्रुप तर्फे पे बॅक टू सोसायटी म्हणून समाज उपयोगी उपक्रमात वाढ करणार

**बीड । प्रतिनिधी**

शिका संघटित व्हा व संघर्ष करा हा डॉ. बाबासाहेबांचा बहुमोल उपदेश लक्षात ठेऊन महामानव अभिवादन ग्रुप; पुढे गेलेल्यांनी मागे असलेल्या समाज बांधवांकरिता बीड शहरात व परिसरात विविध समाज उपयोगी उपक्रम राबवत आहेत.डॉ. बाबासाहेबांनी ८ जुलै १९४५ रोजी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचा ८० वा वर्धापन दिन धम्मदीप बुद्ध विहार बलभीम नगर, शिवाजीनगर बीड येथे मोठ्या उत्साहात विद्यार्थी व पालक यांच्या उपस्थितीत संपन्न करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षपदी से. नि. सी. ई.ओ (जी प) पी. व्ही. बनसोडे हे लाभले होते तर से.नी उपनिबंधक (सहकार) ड. हनुमंत कांबळे व

से.नि जिल्हा प्रबंधक (एल.आय. सी) आयु. यु. एस. वाघमारे लाभले होते. विचार मंचावर अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जि.एम.भोले, वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी.जी.वानखेडे व समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले,युवराज सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते तथागतांच्या प्रतिमेस पुष्प, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाईच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे



सूत्रसंचालन ड तेजस वडमारे यांनी केले तर प्रास्ताविक जी.एम भोले यांनी करून आपल्या प्रास्ताविकात पी ई एस सोसायटीच्या स्थापने मागची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका सविस्तरपणे विषद केली व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पे बॅक टू सोसायटी या उपदेशानुसार समाजातील दानदात्याच्या भरघोस मदतीच्या जोरावर सध्या सुरू असलेल्या २ मोफत शिकवणी वर्गासह गोरगरीब, मजुरांच्या व गरजू मुलांकरिता आणखी २ ठिकाणी मोफत शिकवणी वर्ग सुरू करण्यात येणार आहेत असे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पी.व्ही बनसोडे उपस्थिताना संबोधित करताना म्हणाले की शिक्षणाशिवाय माणसाची सर्वांगीण प्रगती होऊ शकत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात अनिष्ट रूढी परंपरेमुळे वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण प्राप्त करणाऱ्या भीमराव या विद्यार्थ्याने विद्येच्या बळावर खंडप्राय आशा भारत देशाचे संविधान लिहिले हे केवळ शिक्षणामुळे साध्य होऊ शकले हे शिक्षणाचे महत्त्व प्रत्येकाने ओळखले पाहिजे. भीमरावांना छत्रपती शाहू महाराज, बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या बहुमोल सहाय्यामुळे परदेशातील नामांकित विद्यापीठातून उच्च विद्याविभूषित होऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण त्याचे संपूर्ण जीवन देश हिताकरिता व संपूर्ण मानव जातीच्या कल्याणा करता अर्पण केले. त्यांनी स्थापन केलेल्या पी ई एस शिक्षण संस्थेतून;शिक्षणापासून वंचित असलेल्या व सर्व समाजातील लाखो विद्यार्थी शिकून उच्च पदापर्यंत पोहोचले त्यांचे हे ऋण शिकलेल्यांनी समाजाचे रून फेडण्याचे कार्य डोळ्यासमोर ठेवून आपले जीवन जगणे गरजेचे आहे असे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितली. याप्रसंगी प्रशांत वासनिक यांनी विद्यार्थी व पालकांशी हितगुज साधतांना स्पष्ट केले की शिक्षण क्षेत्रात राजा मिलिंद सारखे विद्यार्थी व भंते नागसेन सारखे गुरु असावयास पाहिजेत भारत भूमीला जगप्रसिद्ध नालंदा, तक्षशिला अशा विद्यापीठांची परंपरा आहे याचा सर्वांनि सार्थ अभिमान ठेवून विद्यार्थ्यांनी राजा मिलिंद सारख्या विद्यार्थ्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्या प्राप्त करावी आशा अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले, प्रमुख पाहुणे हनुमंत कांबळे यु एस वाघमारे युवराज सोनवणे यांनी पी ई एस शिक्षण संस्थेबद्दल व शिक्षण हीच उन्नतीची गुरुकिल्ली आहे हे स्पष्ट केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी एम राऊत यांनी व्यक्त केले तर कार्यक्रमास प्रा. अशोक गायकवाड,के एस वाघमारे, एस.एस.सोनवणे,बी.जी. दळवी, भारत शिरसट, तेजस वडमारे,सुजाता वाघमारे,अंजली विशाल वडमारे,आशाबाई भालेराव,स्वाती वडमारे,आचल वडमारे, कु.किरण वडमारे,रमाबाई सोनवणे उर्मिला वडमारे,राज जाधव, प्रेम जोगदंड, सिद्धार्थ साळवे व परिसरातील बालक बालिका व उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. महामानव अभिवादन ग्रुप तर्फे शालेय साहित्य वाटप कार्यक्रमांतर्गत २३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) व खाऊ वाटप करून सरनातंय ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# लैंगिक अपराधा बाबत चिंचोली माळी येथे पोलिसांच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## गुड टच आणि बॅड टच कसा ओळखावा याची दिली पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना माहिती

**केज । गौतम बचुटे**

लैंगिक अपराधाला वेळीच आळा घालण्यासाठी जाणून बुजून कोणी लगट करीत असेल किंवा स्पर्श करीत असेल तर ती ओळखण्याची मुलींना समज आल्यास अपराध टाळले जाऊ शकतात आणि गुन्हेगारांचा बंदोबस्त करता येऊ शकतो त्यासाठी गुड टच आणि बॅड टच या संदर्भातील माहिती पोलीस उपनिरीक्षक राकेश बनसोडे यांनी चिंचोली माळी येथील शाळेत अयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात दिली.दि. ९ जुलै रोजी केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील कर्मवीर विद्यालयात लैंगिक अपराध आणि त्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यासाठी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या आदेशावरून पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे यांनी विद्यार्थ्यांनी व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे यांनी लैंगिक अपराधापासून बालकाचे संरक्षण अधिनियम याची माहिती दिली. तसेच शाळेत आणि परिसरात होणारा रोड रोमिओ कडून करण्यात येत असलेला पाठलाग, मोबाईलचे दुष्परिणाम आणि सायबर गुन्हे यासह ओळखीचे व अनोळखी व्यक्ती यांच्याकडून शरीराशी करण्यात येणारे गुड टच आणि बॅड टच कसा ओळखावा? याची माहिती दिली. काहीही तक्रार असल्यास तात्काळ पोलिसांना आणि पालक व शिक्षक यांना कळवविण्या बाबत सांगून स्वतःसह पोलीस अधिकाऱ्यांचे मोबाईल नंबर दिले. त्याच बरोबर शाळेमध्ये घडणाऱ्या अपराधाची माहिती शिक्षकांनी आणि गावकऱ्यांनी व जागरूक नागरिकांनी पोलिसांना माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली.

## धार्मिक कार्यात नावंदे परिवाराचे उत्स्फूर्त योगदान

# श्रीगुरु काशीनाथ शिवाचार्य महाराज यांचे गौरवोद्गार

**पाथरी । प्रतिनिधी**

धार्मिक कार्यात नावंदे परिवार परचुंडी यांचे योगदान अत्यंत मोलाचे असून, गुरूप्रती त्यांची अपार श्रद्धा आणि स्नेह आहे, असे गौरवोद्गार ष.ब्र.१०८ श्रीगुरु काशीनाथ शिवाचार्य महाराज (पाथरी मठ) यांनी आपल्या आशीर्वचनात व्यक्त केले.

पाथरी येथील श्री गुरु कांचबसवेश्वर मठ संस्थान येथे दिनांक ३ जुलै ते १० जुलै २०२५ दरम्यान अखंड शिवनाम सप्ताह व गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला जात आहे. या निमित्ताने आजच्या दिवशी आयोजित महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन श्री लक्ष्मणआप्पा नावंदे, वसंत नावंदे, नागनाथ नावंदे व अशोक नावंदे गुरुजी परचुंडीकर




यांच्या वतीने करण्यात आले.

सकाळच्या सत्रात श्री गुरु कांचबसवेश्वर यांच्या समाधीवर अभिषेक करण्यात आला. त्यानंतर परमरहस्य पारायण, भजन व श्रीगुरु काशीनाथ शिवाचार्य महाराज यांचे प्रवचन संपन्न झाले. या वेळी नावंदे परिवाराच्या वतीने श्रीगुरुंचे औपचारिक स्वागत करण्यात आले.कार्यक्रमास वीरशैव समाज परचुंडी व वीरशैव समाज पाथरी येथील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुसंघटित आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात हा धार्मिक सोहळा संपन्न झाला.

# मुख्याध्यापकाच्या मनमानी वेळा पत्रक बदलामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान

## शिक्षक भारतीने चौकशीची मागणी केली

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील एका खासगी अनुदानित माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकाने शिक्षण विभागाची कोणतीही परवानगी न घेता शाळेच्या वेळापत्रकात मनमानी बदल केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शासनाच्या ठराविक नियमानुसार सकाळी १०:३० ते दुपारी ४:३० या वेळेत शाळा चालवणे बंधनकारक असतानाही, ४ जुलै रोजी संबंधित मुख्याध्यापकाने शाळेची वेळ अचानक सकाळी ७:३० ते १०:०० अशी जाहीर केली. या बदलामुळे विद्यार्थ्यांना पूर्ण दिवसाचे शिक्षण न मिळता त्यांचा शैक्षणिक दिवस वाया गेला. यामुळे पालक व शिक्षक वर्गातही नाराजी पसरली आहे.

या प्रकाराची माहिती मिळताच 'शिक्षक भारती' संघटनेने तातडीने हा मुद्दा उचलून धरत मुख्याध्यापकाविरोधात संबंधित माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे अधिकृत तक्रार दाखल केली. संघटनेचे करमाळा तालुकाध्यक्ष विजयकुमार गुंड यांनी आपल्या निवेदनात केवळ वेळापत्रक बदलाचाच नव्हे, तर अन्य गंभीर अनियमिततांचाही उल्लेख केला आहे.



मुख्याध्यापक उन्हाळी सुट्टीदरम्यान शाळेत अनुपस्थित राहिल्याने शाळेतील दुरुस्ती व देखभाल कामांमध्ये दुर्लक्ष झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय हजेरी पत्रकात बोगस सह्यांचा संशयही त्यांनी व्यक्त केला असून, सीसीटीव्ही फुटेजची चौकशी करून सत्यस्थिती समोर आणावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या प्रकारामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर झालेच आहे, पण मुख्याध्यापकाच्या मनमानी वृत्तीमुळे शिस्तभंगाचे वातावरण निर्माण झाल्याची भावना शिक्षकांमध्ये आहे. शिक्षक भारतीसारख्या संघटनेने या प्रकरणात उचलून धरलेली भूमिका केवळ शिक्षण व्यवस्थेतील शिस्त पुनर्स्थापित करण्यासाठी नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या हितासाठी आवश्यक असल्याचे मत शिक्षणवर्तुळात व्यक्त केले जात आहे.

# केज उपजिल्हा रुग्णालयाला आरोग्य उपसंचालकांची सरप्राइस व्हिजिट

## कामकाज आणि उपचारा विषयी केले समाधान व्यक्त

**केज । प्रतिनिधी**

केज उपजिल्हा रुग्णालयास आरोग्य उपसंचालक डॉ. अर्चना भोसले-किर्दक यांनी मंगळवार दि. ८ रोजी दुपारी अचानक भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. भेटी दरम्यान त्यांनी उपजिल्हा रुग्णालयाच्या विविध विभागाच्या कामाची पाहणी करून संबंधित विभाग प्रमुखा कडून कामकाजाची माहिती जाणून घेतली. रूग्णालयाच्या स्त्रीरोग, नेत्ररोग, शस्त्रक्रिया व प्रसुती विभागाच्या कामा विषयी समाधान व्यक्त केले.

केज शहरातील उपजिल्हा रुग्णालयास लातूर विभागाच्या आरोग्य उपसंचालक डॉ. अर्चना भोसले-



किर्दक यांनी मंगळवारी दुपारी अचानक भेट दिली. या भेटी दरम्यान त्यांनी उपजिल्हा रुग्णालयाच्या स्त्रीरोग, नेत्ररोग, शस्त्रक्रिया, प्रसुती, बालरोग, अस्थीरोग व अपघात विभागास भेट देऊन पाहणी केली. तसेच अंतररूग्ण विभागात उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या प्रकृती व उपचारा बाबत आणि दाखल रूग्णांशी व वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संवाद साधून माहिती घेतली.

या वेळी अंतररुग्ण विभागात एकूण ७५ रुग्ण उपचार घेत असल्याचे दिसून आले. उपजिल्हा रूग्णालयाच्या शस्त्रक्रिया विभागात रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे यांनी चार तर स्त्रीरोग ताजद डॉ. केशव इंगोले यांनी सहा अशा लहान-मोठ्या एकूण दहा शस्त्रक्रिया केल्या होत्या. त्या नंतर आरोग्य उपसंचालकांनी उपजिल्हा रूग्णालयातील अंतररूग्ण विभागातील रूग्ण संख्या, उपलब्ध आरोग्य सोयी-सुविधा, कामकाजातील शिस्त परिसर स्वच्छता पाहून समाधान व्यक्त केले. यावेळी उपजिल्हा रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. केशव इंगोले, भूलतज्ज्ञ डॉ. डिगांबर मुंडे, बालरोग तज्ज्ञ डॉ. बालासाहेब सावंत, डॉ. सोनाली राऊत, डॉ. सुल्तान, रक्तपेढीचे श्रीकृष्ण नागरगोजे यांच्यासह उपजिल्हा रूग्णालयाचे कार्यालयीन कर्मचारी, परिचारिका व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# मंगल देशा पवित्र देशा-भूषण गवईंचं भाषण संपताच टाळ्यांचा कडकडाट

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे सुपुत्र भूषण गवई हे काही दिवसांपूर्वी सरन्यायाधीशपदी विराजमान झाले आहेत. त्यानिमित्ताने आज मंगळवारी महाराष्ट्राच्या विधिमंडळात त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच भारतीय राज्यघटना या विषयावर त्यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सदस्यांपुढे प्रबोधनपर भाषण केले. दरम्यान, यावेळी गवई यांनी भारतीय राज्यघटनेविषयी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाविषयी मतं मांडली. तसेच विधीमंडळाने केलेला सत्कार माझ्यासाठी फार महत्त्वाचा आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. विशेष म्हणजे त्यांच्या भाषणानंतर दोन्ही सभागृहांच्या सदस्यांनी, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी उभे राहून पुढची कित्येक मिनिटे सरन्यायाधीश यांचा टाळ्या वाजून सन्मान केला.सरन्यायाधी भूषण गवई यांच्या सत्कारासाठी विधानपरिषद आणि विधानसभा या दोन्ही सभागृहांचे सदस्य यावेळी उपस्थित होते. तर मंचावर विधानसभेचे अध्यक्ष, विधानपरिषदेचे सभापती, विरोधी पक्षनेते, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आदी नेते उपस्थित होते. भूषण गवई यांनी विधिमंडळाने केलेला सत्कार स्वीकारत हा सत्कार माझ्यासाठी फार लाखमोलाचा आणि अमूल्य आहे, असे मत व्यक्त केले. तसेच पुढे बोलताना भारतीय संविधानाची निर्मिती, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये तसेच मसुदा समिती यावर भाष्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानाविषयीचे विचारही त्यांनी यावेळी बोलून दाखवले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077